जळगाव जिल्हा पोलीस
दिनांक १२/०३/२०२५

-: प्रेस नोट :-

प्रति,

मा.संपादक,

----------------

**विवाह मंगल कार्यालयातुन लग्नातील सोन्याचे व चांदीचे तसेच पैशाची बॅग पळविणा-या जिल्हयातील दाखल गुन्ह्यातील मोठया किमंतीचा मुददेमाल हस्तगत**

--- ००० ---

दिनांक १७/०२/२०२४ रोजी चाळीसगाव येथील विराम गार्डन लॉन्स येथुन लग्णातील मोठा किमंतीचे विवाहीतेचे सोने व चांदीचे दागिणे चोरी झाल्याने चाळीसगाव ग्रामीन पो.स्टे. ला CCTNS NO ५४/२०२५ भा.न्या.सं. ३०३(२),३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.तसेच मुक्ताईनगर पोलीस स्टेशन, भडगाव पोलीस स्टेशन तसेच अंमळनेर पोलीस स्टेशन येथे वृदध इसमांच्या पैशाच्या बॅग चोरी केल्याच्या घटनांच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्णत आलेले होते.

सदर वरील दाखल गुन्ह्याचे घटनास्थळी भेट देवून मिळालेले तांत्रिक पुराव्या वरून सदरचे गुन्हे हे गुलखेडी , कडीया सांसी ता. नरसिंहगढ जि. राजगढ राज्य मध्यप्रदेश येथील आरोपीतांनी केले असल्याची माहीती केली असल्याची माहीती प्राप्त झाल्याने मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक गुलखेडी , कडीया सांसी ता. नरसिंहगढ जि. राजगढ राज्य मध्यप्रदेश येथे पाठविले असता सदर पोलीस पथकाने समांतर सदर गुन्हयांचा तपास करुन आरोपीतांच्या नातेवाईकांकडुन सदर गुन्हयातील खालीलप्रमाणे गुन्हयातील मुददेमाल हस्तगत करण्यात आला .

| अ.क्र | पोलीस स्टेशन | गु.र.क्र व कलम | हस्तगत मुददेमाल |
|---|---|---|---|
| ०१ | चाळीसगाव ग्रामीण | ५४/२०२५ भा. न्या. सं. ३०३ (२) ,३०५ | ०१)एक सोन्याचे पेंडंट दोन्ही बाजुला चार पदर असलेला सोन्याचा राणीहार वजन ४२.१२० ग्रॅम कि.३,३२,७४८/-<br>०२) एक सोन्याचे पेंडट असलेली त्यात काळे मणी असलेले सोन्याचे मंगलपोत वजन अंदाजे ४६. ५८०/- कि. अंदाजे ३,६५,६११/-<br>०३) दोन सोन्याच्या नक्षीदार बांगडया वजन अंदाजे ३०.०४० ग्रॅम कि.अंदाजे २,५८३४४/-<br>०४) दोन सान्याचे कानातील चौकोनी आकाराचे कर्णफुले वजन अंदाजे ०३.४८० ग्रॅम कि.अंदाजे २७,४९२/-<br>०५) दोन सोन्याचे कानातील गोलाकार कर्णफूले वजन अंदाजे ०७.३१०किमंत अंदाजे ५५,९३२/-<br>०६) एक चांदीच्या गोलाकार कडीत ओवलेले पाच चांदीचे पंचकोनाकृती देवांच्या प्रतिकृती वजन २१८.२०० ग्रॅम किंमत अंदाजे १८६५६/-<br>०७) रोख रक्कम रुपये दोन लाख रुपये<br>एकुण हस्तगत मुददेमाल-१२,९७,०००/- |
| ०२ | मुक्ताईनगर पोलीस स्टेशन | ५७/२०२५ भा. न्या. सं. ३०३ | रोख रक्कम रुपये १,५०,०००/- |
| | | (२) | |
| ०३ | भडगाव पोलीस स्टेशन | ३३/२०२५ भा. न्या. सं. ३०३ (२) | रोख रक्कम रुपये १,३५,०००/- |
| ०४ | अंमळनेर पोलीस स्टेशन | ३७४/२०२४ भा. न्या. सं. ३०५(ए) | रोख रक्कम रुपये ४०,०००/- |

सदरची कारवाई मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्री अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्रीमती कवीता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव, मा.श्री.बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक, स्थागुशा जळगाव,पोलीस निरीक्षक राहुल कुमार पवार चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशन,पोलीस निरीक्षक नागेश मोहीते मुक्ताईनगर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी श्री कुणाल चव्हाण,गणेश वाघमारे पो.ना भगवान पाटील,श्रीकृष्ण देशमुख , पोकॉ महेश पाटील ,महेश सोमवंशी सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव पोह नितीन सोनवणे, पोकॉ किरण देवरे चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशन तसेच मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोहवा राजकुमार चव्हाण पोना सुरेश मेंढे पोकॉ सुनिल मोरे यांनी केला आहे.



